# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०५/०७/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा पालीउमरी येथे दिनांक २६/०६/२२ चे १७.३० वा. सुमारास **उपासकर केशवराव केवट (मृतक), वय ५७ वर्ष रा. पाली उमरी** याने आपल्या राहत्या घरी पत्नी सोबत झालेल्या घरगुती भांडणाचे कारणावरून विषारी औषध प्राशन केले. त्यास उपचाराकरीता प्रथम ग्रामीण रूग्णालय रामटेक येथे घेवुन गेले तेथुन रेफर केल्याने पुढील उपचारकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती दरम्यान दि. ०४/०७/२०२२ चे ०८.२० वा. तेथील डॉक्टरांनी मृत घोषीत केले. मेडीकल कॉलेज नागपुर येथील कागदपत्र प्राप्त झाल्यावरून सदर मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अक्षय लिलाधर केवट वय ५४ वर्ष रा. पाली उमरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सुरू आहे.

२) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत मौजा पाटणसावंगी बाजार चौक येथे दिनांक ०५/०७/२०२२ चे ०३.३० वा. सुमारास फिर्यादी ही आपली मुलगी व नातीन कु. पुनम फुलसिंग मिना, वय १० वर्ष, **२) कु. साक्षी फुलसिंग मिना (मृतक), वय ६ वर्ष ३) कु. राधिका फुलसिंग मिना(मृतक), वय २ वर्ष दोन्ही रा. बाजार चौक पाटणसावंगी** यांचे सह आपले घरी झोपली असता मृतक राधिका हिची अचानक प्रकृती खराब झाल्याने (शौचास जाउन परत आल्यानंतर गळयात खवखव होत आहे असे म्हणुन हाताची मुठी बांधून थंड पडली) घरीच मरण पावली. त्यानंतर मृतक साक्षी हिची सुध्दा प्रकृती खराब झाल्याने तिला उपचाराकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र पाटणसावंगी येथून नागपूर येथे नेत असतांना मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गं.भा. गंगाबाई भैयाजी काळे वय ५० वर्ष, वार्ड क्र. १ बाजार चौक पाटणसावंगी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सपोनी निंशात फुलेकर मो क्र ७५८८५६४३०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर